**कृपया प्रसिध्दीसाठी** **21 ऑक्टोबर 2009**

## ग्राहक मूल्य निर्देशांकाचे आधार वर्ष बदलून जनतेची दिशाभूल करण्याचा केंद्र सरकारचा प्रयत्न : राम नाईक

**मुंबई, बुधवार :** ग्राहक मूल्य निर्देशांक काढण्यासाठीचे आधार वर्ष बदलून तसेच महागाई निर्देशांक दर आठवड्याऐवजी दरमहा प्रसिध्द करण्याचे ठरवून सर्वत्र आलबेल आहे असे चित्र काँग्रेस सरकार निर्माण करु पाहात आहे, असा आरोप भारतीय जनता पार्टीचे नेते व माजी पेट्रोलियम मंत्री श्री.राम नाईक यांनी आज मुंबईत प्रसिध्दीपत्रकाद्वारे केला आहे.

वाढती महागाई सहज लक्षात येऊ नये यासाठीच निर्देशांकासाठीचे आधारभूत वर्ष 1993-1994 ऐवजी 2004-2005 करण्याचा घाट पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंह यांच्या सरकारने घातला आहे, असेही श्री.नाईक यांनी म्हटले आहे. मूल्य निर्देशांकाचे आधारभूत वर्ष बदलल्यास वाढलेली महागाई कागदोपत्री तेवढी गंभीर वाटणार नाही, अशी रंग सफेदी करुन देशाच्या आर्थिक स्थितीचे खोटे लोभस चित्र केंद्र सरकार निर्माण करु पहात आहे. महागाईचे चटके बसणा-या सामान्य जनतेमध्ये वाढता महागाई निर्देशांक बघून अधिकाधिक असंतोष निर्माण होतो. या असंतोषाची धार बोथट करण्यासाठी आता महागाई निर्देशांकही दर आठवड्याऐवजी महिन्यातून एकदा जाहीर करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे, अशी टीकाही श्री.राम नाईक यांनी केली आहे.

काँग्रेस सरकारने आकड्यांचे खेळ करुन देशात आणि देशाबाहेरही देशाची आर्थिक स्थिती मजबूत असल्याचे चित्र निर्माण करण्याचा कितीही प्रयत्न केला तरी जनता फसणार नाही, असे मत व्यक्त करुन श्री.राम नाईक म्हणाले, "आंतरराष्ट्रीय अर्थकारणात अशा बदलांमुळे देशाची प्रतिमा खालावते एवढी साधी गोष्टही अर्थतज्ञ पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंह यांनी ध्यानी घेऊ नये ही खेदाची बाब आहे."

**(कार्यालय सचिव)**